
# राहुलमाता

(यशोधरा)

मराठी



विपश्यना विशोधन विन्यास

# राहुलमाता

## (यशोधरा)

मराठी

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

# M36 - राहुलमाता (यशोधरा)

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २०१९

**मूल्यः रु. ३०.००**

ISBN 978-81-7414-420-1

**प्रकाशकः**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा - नाशिक, महाराष्ट्र
फोनः ०२५५३-२४४९९८, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०;
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रकः**

**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
जी-२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

# राहुलमाता

## (यशोधरा)

## विषयानुक्रमणिका


प्रकाशकीय ........................................ ५

राहुलमाता ........................................ ९

तपस्वी सुमेध आणि सुमित्रा ........................................ ९

सिद्धार्थ आणि यशोधरेचा जन्म ........................................ १०

सिद्धार्थ आणि यशोधराचा विवाह ........................................ १२

चार निमित्त ........................................ १३

गृह-त्याग ........................................ १५

बोधिसत्वाचे भव-संसरण समाप्त झाले ........................................ १८

अनेकांचे मंगल साधले ........................................ २०

कपिलवस्तुमध्ये आगमन ........................................ २१

राहुलला त्याच्या वडिलांचा परिचय करुन दिला ........................................ २२

धर्म-पत्नी यशोधरा ........................................ २५

राहुलला प्रव्रज्येसाठी प्रेरित केले ........................................ २७

भद्दकच्चानाची प्रव्रज्या ........................................ २९

महाअभिज्ञावती झाली ........................................ २९

बोधिसत्व व राहुलमातेचे भव-संसरण ........................................ ३०

महाराज सुदस्सन आणि महाराणी सुभद्दा ........................................ ३१

तृष्णारुपी धन-धान्य-पुत्र-पत्नी हेच खरे बंधन ........................................ ३५

अनित्यतेचे प्रकाशन ........................................ ३६

परिनिर्वाण ........................................ ३९

विपश्यना साधना केंद्र ........................................ ४०

# प्रकाशकीय

# प्रकाशकीय

पाली साहित्यात यशोधरेचे वर्णन मुख्यतः राहुलमाता, बिम्बादेवी, भद्दकच्चाना ह्या नावाने मिळते. इतरत्र यशोधरेचे वर्णन बिम्बासुंदरीच्या रुपातही मिळते. हि नाव यशोधरेची वैशिष्ट्ये प्रकट करणारी विशेषणे आहेत असे वाटते, जी नंतर उपनाव किंवा नाव झाली.

यशोधरा ह्या नावातच एक विशेषण आहे. यशोधरा, जी यश धारण करते. ती बुद्धासारख्या महामानवाची पत्नी झाली. राहुलसारख्या सुपुत्राची आई झाली म्हणून राहुलमाता म्हटली गेली. भद्दकच्चानाच्या रुपात तिने महाअभिज्ञा प्राप्त करुन अनेकांच्या मुक्तीत सहायक होऊन अमर्यादित यश प्राप्त केले. 'भद्दकच्चाना' हे नाव यशोधरेच्या उत्तम सुवर्णवर्णाकडे लक्ष वेधते. प्रव्रज्या ग्रहण केल्यानंतर ती 'भद्दकच्चाना' ह्या नावाने जास्त प्रसिद्ध झाली. बिम्बाचा अर्थ आहे चंद्राची आभा आणि शीतलता, जे तिचा गोरा रंग आणि शांत स्वभाव दर्शवितात. बिम्बासुंदरी नाव तिच्या रुपाला आणखीनच खुलविते. बिम्बादेवी आदरसूचक वाटते. हि नाव तिच्या रंग, रुप, गुण, शील, स्वभाव इत्यादींना लक्षवेधित करतात.

यशोधरेचा जन्म कोलिय राज्याची राजधानी देवदहमध्ये वैशाख पौर्णिमेच्या दिवशी झाला. त्याच दिवशी शाक्यवंशीय कुमार सिद्धार्थाचा सुद्धा जन्म झाला. बाळ सिद्धार्थच्या शरीरावर महापुरुषाच्या बत्तीस लक्षणांना पाहून ब्राह्मण ऋषिदेवलने अशी भविष्यवाणी केली की हे बाळ, सिद्धार्थ पुढे सम्यक संबुद्ध होईल.

सोळाव्या वर्षी यशोधरेचा विवाह कुमार सिद्धार्थाबरोबर झाला. राजकुमाराच्या मनात सर्वज्ञता प्राप्त करण्याची इच्छा दिवसेंदिवस प्रबळ होत होती. ज्यामुळे तो जाणू शकेल की प्राणी दुःखात का तडफडत राहतो आणि ह्या दुःखचक्रापासून, भवचक्रापासून कशी सुटका होऊ शकेल. समस्त लोकचक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्यासाठी राजकुमार सिद्धार्थने चार निमित्तांना (जरा, व्याधी, मृत्यू तसेच एक तपस्वी) पाहून गृहत्याग करण्याचा निश्चय केला.

यशोधरेने पुत्र राहुलला जन्म दिला, सेवकाने येऊन राजकुमार सिद्धार्थला पुत्र जन्माची बातमी दिली. गृहत्याग करण्यापूर्वी राजकुमार सिद्धार्थने विचार

केला की एकवेळ पुत्र राहुलला पाहूया. यशोधरेला आणि पुत्र राहुलला झोपलेल्या अवस्थेत पाहून त्यांना उठविणे योग्य वाटले नाही. त्यांना उठविल्यानंतर गृहत्याग करण्याची त्याची योजना असफल झाली असती. म्हणून राजकुमार सिद्धार्थने बाळाचे ओझरते दर्शन घेऊन गृहत्याग करण्याचा निर्णय केला आणि निश्चय केला की बोधी प्राप्त झाल्यानंतरच ह्याला पाहायला येईन.

हे सत्य आहे की घर सोडतेवेळी त्याने यशोधरेला जागे करुन सूचित केले नाही. कारण स्पष्ट होते. यशोधरेने विलाप करीत विरोध केला नसता तरी राहुलला जाग येणे स्वाभाविक होते. त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून महाराज शुद्धोदन आणि महाप्रजापती गौतमीला जाग येण्याची आशंका स्पष्ट होती. अशा परिस्थितीत गृहत्याग करणे कठीण झाले असते.

परंतु यशोधरेला सिद्धार्थच्या गृहत्यागाची घटना आकस्मित नव्हती. दोघे समवयस्क होते. दोघांनी एकत्र तेरा वर्ष आपसात तेढ न ठेवता सुखी दांपत्य जीवन घालविले होते. दोघे एक दुसऱ्याच्या मनोवृत्तीला चांगल्या प्रकारे समजत होते.

एकोणतीस वर्षाचे वय पोरकट नसते. दोघे समजदार होते. गृहत्याग करण्याच्या गंभीर विषयावर एकमेकांशी चर्चा अवश्य झाली असावी. राजकुमार सिद्धार्थ चक्रवती सम्राट न होता सम्यक-संबुद्ध होऊ इच्छित होता, ज्यामुळे तो आपला परिवार तसेच अन्य अगणित प्राण्यांच्या भव-संसरणाच्या दुःखापासून पूर्णपणे मुक्त होण्यासाठी सहायक बनू शकेल.

यशोधरेसारख्या सती, साध्वी, पतिपरायण गृहिणीसंबंधी नासमज तसेच विरोधी मतांच्या लोकांनी अनेक काल्पनिक गोष्टी जुळवून पसरविल्या. त्यांचा उद्देश राजकुमार सिद्धार्थला नितांत निष्ठूर आणि निर्दयी दाखवणे असा होता. तसेच पतीने गृहत्याग केल्यानंतर यशोधरेला दुःख झालेच नाही असे म्हणणे चुकीचे ठरेल. परंतु जी अतिशयोक्ती निंदकांनी पसरविली, ती तथ्यहीन आहे. विशाल त्रिपिटक साहित्यात सिद्धार्थने गृहत्याग केल्यानंतर यशोधरेच्या विलापाचे वर्णन कोठेही नाही. तिला आपल्या आदरणीय पतिविषयी खूप श्रद्धा होती, भक्ती होती, विश्वास होता.

ह्या लोककल्याणकारिणी मनोवृत्तीविरुद्ध काय तर्क असेल बरे? यशोधरा ह्या जनकल्याणी विचारधारेचा काय विरोध करेल? आणि का विरोध करेल?

अल्पकाळातच गृहत्यागी राजकुमार सिद्धार्थ सम्यक-संबुद्ध झाले. भगवान सम्यक संबुद्धांनी संघासह कपिलवस्तु नगरात पदार्पण केले. नगरातील सर्व नगरवासियांना संघदानाच्या पुण्याने लाभान्वित करण्यासाठी भगवान भिक्षु-संघासह घरोघरी भिक्षा घेण्यासाठी निघाले. महालाच्या ओसरीत लाडक्या राहुलसह उभ्या असलेल्या राहुलमाता यशोधरेने समोरच्या राजपथावर श्रमणसंघासह येत असलेले त्याचे वडील भगवान बुद्धांचा त्याला असा परिचय करुन दिला.

**एस हि तुय्ह पिता नरसीहो.....**

पहा, हे जे पुरुषांमध्ये सिंहासारखे आहेत. हेच तुझे वडील आहेत.

ज्या प्रसन्नचित्ताने यशोधरेने आपल्या पूर्व पतीचा परिचय पुत्र राहुलला दिला त्यावरुन आपण पाहतो की पतीच्या गृहत्यागाचा तिच्या मनात रोषही नाही व क्षोभही नाही. उलट श्रद्धा आणि गर्व आहे की त्यांनी लोकहितासाठी गृहत्याग केला. त्यामध्ये ते सफल झाले आणि लोककल्याणाला लागले. तिच्या पुत्राच्या मनातसुद्धा हाच भाव जागो अशी इच्छा ती करते म्हणून असा योग्य आणि गौरवपूर्ण परिचय करुन दिला.

भगवानांनी राजमहालात पदार्पण केल्यानंतर सर्व सदस्य त्यांना नमस्कार करण्यासाठी आले, फक्त यशोधरा आली नाही. तिने निरोप पाठविला की जर माझ्यामध्ये काही गुण असतील तर आर्यपुत्र स्वतः माझ्या निवासात येतील. तेव्हा मी त्यांची वंदना करीन. यशोधरेजवळ गुणांचे भांडार होते. म्हणून भगवानच तिच्या निवासात गेले. महाराज शुद्धोदनसुद्धा त्यांचे भिक्षापात्र घेऊन बरोबर गेले. सारिपुत्र आणि महामोग्गल्लानसुद्धा त्यांचेबरोबर गेले. भगवानांनी आपल्या दोन्ही प्रमुख शिष्यांना सांगितले की राजकन्या यशोधरा कशाही प्रकारे वंदना करो, तिला अडवू नका.

कोणी स्त्री एका गृहत्यागी श्रमणाच्या शरीराला स्पर्श करु शकत नाही, पायाला सुद्धा नाही. हा तर साधारण श्रमण नाही, अरहंत आहे, सम्यक-संबुद्ध आहे. कोणी स्त्री, भलेही त्यांची पूर्व पत्नी का असेना, त्यांच्या शरीराला स्पर्श कसा करु शकेल? परंतु महाकारुणिक भगवानांच्या मनात अमर्याद मैत्रीचा प्रवाह वाहू लागला. देवी यशोधरा आली आणि भगवानांच्या समोर बसून त्यांचे पाय पकडून आपल्या मनासारखी वंदना केली. कोणीही कोणत्याचप्रकारे अडथळा आणला नाही.

काही कल्पांपूर्वी जेव्हा सिद्धार्थ गौतमने तापस सुमेधच्या रुपात भगवान

दीपङ्कर सम्यक संबुद्धांकडून आशीर्वाद प्राप्त केला होता की भविष्यात तो सिद्धार्थ गौतम ह्या नावाने सम्यक संबुद्ध होईल, तेव्हा यशोधरेने सुद्धा तेव्हाच्या ब्राह्मणपुत्रीच्या रुपात त्यांच्याकडून आशीर्वाद प्राप्त केला होता की ती जन्मोजन्मी त्यांची धर्मपत्नी होऊन त्यांना साथ देईल. आता ह्या दोघांचा अंतिम जन्म होता. ती पत्नी झाली तर सम्यक संबुद्ध होण्यासाठी सिद्धार्थ गौतमांना साथ का देणार नाही?

यशोधरेच्या मनाची ही पार्श्वभूमी नसती तर ती पतीने गृहत्याग केल्यानंतर एका साधारण गृहिणीप्रमाणे तिने विलाप केला असता. आपल्या पळपुट्या नवऱ्याला दोष दिला असता. आपल्या शृंगाराचा त्याग केला नसता. उलट अत्यंत सुंदर, रुपवती तरुण राजकन्या असल्याने कोण्या दुसऱ्या राजकुमाराला निवडून पुनर्विवाह केला असता आणि सांसारिक सुखाचे जीवन जगली असती.

परंतु यशोधरा बोधीसत्वाची जन्मोजन्मींची धर्मपत्नी होती. असे कसे करेल बरे? ती खूप समजून होती की कोणत्या महान उद्देश्याने पतीने घर सोडले आहे. विलाप करण्याऐवजी त्यांच्या सफलतेची मंगलकामनाच करीत राहिली.

ममतामयी माता यशोधरेने पुत्राला प्रव्रज्येसाठी प्रेरित केले. भगवानांकडून पुत्र राहुलला उत्तराधिकाराच्या रुपात चार आर्य सत्यांची विद्या प्राप्त झाली. ह्याचा अभ्यास करीत राहुलने अरहंत अवस्था प्राप्त केली.

भगवानांनी भिक्षुणीसंघाची स्थापना करण्यासाठी महाप्रजापती गोतमीला अनुमती दिल्यानंतर यशोधरासुद्धा राजवाड्याच्या सुखाचा त्याग करुन प्रव्रजित झाली आणि लवकरच अरहंत झाली, तसेच आपल्या असंख्य कल्पांतील अनेक पूर्वजन्मांचे स्मरण करण्याची अभिज्ञा प्राप्त केली. यशोधरेच्या ह्या गुणामुळे भगवानांनी तिला आपल्या भिक्षुणी-श्राविकांमध्ये महाअभिज्ञा प्राप्त करणाऱ्यात अग्र ही उपाधी प्रदान केली.

यशोधरेने स्वतः भवमुक्त अरहंत अवस्था प्राप्त करुन जीवन सफल तर केलेच पण अनेकांना ह्या मार्गावर चालण्याची प्रेरणा प्रदान केली.

यशोधरेचे जीवन-चरित्र आम्हा सगळ्यांच्या प्रेरणेचे कारण होवो. साधक-साधिकांच्या पुण्य-पारमितांच्या संवर्धनासाठी सहायक होवो. ह्या मंगल भावनेसह या पुस्तिकेचे प्रकाशन केले जात आहे.

**विपश्यना विशोधन विन्यास**